महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
कामगार औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
email : ciro@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

जा.क्र. : कावि/मानिभ/ ११२४४ दिनांक : ११/08/2011

# परिपत्रक

विषय :- मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांचे मासिक निर्वाह भत्ता मिळण्यासाठीची प्रकरणे पाठविण्याबाबत.

*********

मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना मासिक निर्वाह भत्ता वेळेवर मिळावा या उद्देशाने विश्वस्त संस्थेने परिपत्रक क्र. कावि/मानिभ/२४८१६ दि. ०६/०८/२०१० द्वारे नवीन व सुधारीत प्रपत्र अंमलात आणले आहे. त्याप्रपत्रामध्ये व परिपत्रकांमध्ये योग्य त्या सूचना दिलेल्या असतानाही अवलंबितांची प्रकरणे परिपूर्ण येत नसून प्रत्येक प्रकरणामध्ये काही त्रुटी आढळून येत आहेत. त्या खाली आपल्या माहितीसाठी नमूद केल्या आहेत.

१) प्रपत्राच्या शेवटी विभाग प्रमुख म्हणून (Head of the Department) मुख्य अभियंता / मुख्य महाव्यवस्थापक यांची सही असणे गरजेचे असताना कार्यकारी अभियंता हे सक्षम अधिकारी नसूनही त्यांच्या सहीने प्रकरणे येत आहेत.
२) ही प्रकरणे लेखा परिक्षण (Audit) करुन घेणे गरजेचे असताना देखील अशी प्रकरणे लेखा परिक्षण न करताच विश्वस्त संस्थेत पाठविण्यात येतात.
३) प्रपत्रामध्ये नमूद केलेली व आवश्यक असलेली माहिती पूर्णपणे न देता अर्धवट माहिती सादर केली जाते.
४) रकाना क्र. १ (i) मध्ये हवी असलेली योग्य ती माहिती पुरविली जात नाही.
५) काही प्रकरणे हातांनी लिहीलेली असतात, अक्षर नीट काढले नसल्यामुळे धनादेश काढताना अडचणी येत आहेत. यापुढे वारसांची प्रकरणे टंकलिखीत करुनच पाठवावी. अवलंबितांचे नांव मराठीमध्ये असल्यास त्यांचे नांव इंग्रजीमध्येही त्या मराठी नांवाच्या खाली देण्यात यावे. यामुळे धनादेशावर चुकीचे नांव नमूद होणार नाही.
६) मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबामधील सर्व वारसांची नांवे नमूद केली जात नाहीत ती करावी.
७) काही प्रकरणामध्ये मृत कर्मचाऱ्यांचे आडनांव व वारसाचे आडनांव यामध्ये तफावत आढळून येते, अशा प्रकरणात शासनाचे राजपत्र पुरावा म्हणून सादर केले असले तरच त्याच्या प्रतीसह प्रकरणे पाठवावीत अन्यथा पाठवू नयेत.

८) ज्या वारसांची नांवे मासिक निर्वाह भत्ता घेण्याचा १० वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यामुळे कमी करण्यात आली आहे, अशी प्रकरणे त्या कुटूंबातील दुसऱ्या वारसांच्या नांवाने पुन्हा संस्थेच्या कार्यालयास पाठविण्यात येतात. नियमाप्रमाणे मासिक निर्वाह भत्ता मिळण्याचा कालावधी पूर्ण केल्यानंतर त्याच कुटूंबातील दुसरा कोणताही वारस पुन्हा मासिक निर्वाह भत्ता मिळण्यास पात्र ठरत नाही. त्यामुळे अशी प्रकरणे पाठविण्यात येऊ नयेत. जर अशी प्रकरणे संस्थेच्या कार्यालयास पाठविण्यात आली तर संबंधित कर्मचाऱ्यावर नियमाप्रमाणे कडक कारवाई करण्यात येईल.

या अशा व इतर त्रुटीमुळे त्यांचे अर्ज विचारात घेणे अडचणीचे होत आहे. तथापि, अवलंबितांना मासिक निर्वाह भत्ता मिळण्यास विलंब होऊ नये म्हणून आतापर्यंत त्रुटी असूनही अर्ज विचारात घेऊन त्यांना मासिक निर्वाह भत्ता मंजूर केला आहे. यापुढे मात्र अपूर्ण माहिती असलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही व मासिक निर्वाह भत्ता मिळण्यास होणाऱ्या विलंबास विश्वस्त संस्था जबाबदार राहणार नाही. तरी आपणास विनंती करण्यात येते की, संबंधित वारसाचे प्रकरणे पाठविताना वर नमूद करण्यात आलेल्या सूचनांचा विचार करुनच अर्ज पाठविण्यात यावेत.

किशोर पवार

मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी व
सदस्य सचिव

प्रत :
महावितरण / महानिर्मिती /महापारेषण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.
(कार्यकारी अभियंतापर्यंत)